# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

## ४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

फॅक्स २५६५६२३४ Email : ropune.dte@gmail.com Web Site : - www.ropune.org.in

**कालमर्यादित : दि.२५.०१.२०१९.**

जा.क्र.तंशिविकापु/विवि/गांधी जयंती/२०१९/ ४१५
दिनांक : 24 JAN 2019

प्रति,
संचालक / प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या
सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित तंत्र शिक्षण संस्था.
(पुणे विभाग पुणे).

**विषय :- राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त कार्यक्रम आराखडा तयार करण्याबाबत.**

संदर्भ :- १. या कार्यालयाचे पत्र जा.क्र.तंशिविकापु/विवि/गांधी जयंती/२०१८/५३७०, दि. २४/१२/२०१८.
२. मा. संचालक, तं.शि.सं.म.रा.मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक : १६/गांधी जयंती/२०१८/५६१, . १७/०९/२०१८.
३. शासन परिपत्रक उ.व.तं.शि.विभाग क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र./४३/समन्वय, दि.१४/०९/२०१८

उपरोक्त विषयाच्या संदर्भ क्रमांक २ व ३ येथील परिपत्रकास अनुसरुन, सदर परिपत्रकात दिलेल्या मुद्यांच्या (सोबत छायाप्रत जोडली आहे) अनुषंगाने, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती निमित्त प्रत्येक संस्थेने, कार्यक्रमाबाबत कृति आराखडा तयार करुन, प्रत्येक महिन्यात त्या कार्यक्रमांची अंमलबजावणी करावी व त्याबाबतचा अहवाल विहित प्रपत्रात प्रत्येक महिन्याच्या २५ तारखेपर्यंत **info.ropune@gmail.com** या ई-मेल आयडी वर या विभागीय कार्यालयास सादर करण्याबाबत वरील संदर्भ क्रमांक १ च्या पत्रान्वये सूचित करण्यात आलेले आहे. परंतु, अद्याप ब-याच शासकीय व अशासकीय अनुदानित संस्थांनी याबाबतचा कार्यक्रम कृति आराखडा तयार केलेला नसून, त्यानुसार आयोजित केलेल्या कार्यक्रमाचा अहवाल विहित मुदतीत या कार्यालयास सादर केलेला नाही.

दिनांक १३/१२/२०१८ रोजी, मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली तसेच मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या उपस्थितीत आयोजित केलेल्या आढावा बैठकीत, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीनिमि-त शासनाने, शासकीय संस्थांमधून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याबाबतचे वार्षिक कॅलेंडर (दिनदर्शिका) तयार करुन, त्यानुसार कार्यक्रमांची अंमलबजावणी करणेबाबत यापूर्वीच सूचित केलेले आहे. मात्र अद्याप कोणत्याही विभागीय कार्यालयाने, त्यांच्या अधिपत्याखालील संस्थांचे असे कॅलेंडर (दिनदर्शिका) संचालनालयास सादर केलेले नाही याबाबत खंत व्यक्त केलेली असून,याबाबतची कार्यवाही लवकरात लवकर करण्यात यावी व सदर कार्यक्रमाबाबतची माहिती वेळेवर संचालनालयास सादर करण्याची दक्षता घेण्याबाबत सूचित केलेले आहे. तरी या प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करण्याकरीता सदरची बाब आपल्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

तरी या पत्राव्दारे सर्व संस्थाप्रमुखांना कळविण्यात येते की, वरील संदर्भिय परिपत्रक / पत्रास अनुसरुन, आपल्या संस्थेत शासनाच्या कार्यक्रम कृति आराखडयानुसार व आपल्या संस्थास्तरावर तयार केलेल्या दिनदर्शिकेनुसार कार्यक्रमांची अंमलबजावणी करवी त्याबाबत माहे जानेवारी-२०१९ मध्ये राबविण्यात आलेल्या कार्यक्रमाबाबतचा अहवाल **Excel Sheet** मराठी फॉन्ट **(ISM)DVTT-Yogesh** या मराठी फॉन्टमध्ये, खालील प्रपत्रात तयार करुन **दिनांक २५/०१/२०१९ पर्यंत Soft Copy** व **PDF-File** अशा दोन्ही स्वतंत्र फाईलमध्ये सादर करावा व त्यासोबत आपल्या **संस्थेच्या दिनदर्शिकेची प्रत जोडावी.** त्याचप्रमाणे यापुढे प्रत्येक महिन्यात राबविण्यात येणा-या कार्यक्रमाबाबतचा अहवाल विहित मुदतीत या विभागीय कार्यालयास वर नमूद केलेल्या ई-मेल पत्त्यावर सादर करावा. जेणेकरुन सदरचा एकत्रित अहवाल संचालनालयास सादर करणे या कार्यालयास शक्य होईल.

**प्रपत्र**

**राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त माहे जानेवारी, २०१९ मध्ये राबविण्यात आलेल्या कार्यक्रमाचा अहवाल**

| संस्थेचा कोड | संस्थेचे नांव | कार्यक्रमाचा विषय | माहे जानेवारी, २०१९ मध्ये राबविण्यात आलेल्या कार्यक्रमाचा तपशील |
|---|---|---|---|
| | | | |

(डॉ.दि.रा.नंदनवार)
प्र. सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : या कार्यालयातील प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता